# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा. क्र. 48/2024 दिनांक : 03.02.2024

## 1)खुन :-

**हिमायतनगर :-** दिनांक 01.02.2024 रोजी चे 24.00 ते दि. 02.02.2024 चे 01.15 वा. चे दरम्यान, **आरोपीचे घरी नेहरूनगर ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील **मयत मुलगी वय 17 वर्षे, रा. नेहरूनगर ता. हिमायतनगर जि. नांदेड,** हिने पळुन गेलेल्या मुला सोबत आई वडीलांचे इच्छेविरूध्द लग्न करायचे आहे असे सांगीतल्याने व त्यांची बरिच बदनामी झाल्याचा राग मनात धरून मुलीस विळयाने व लाकडाने डोक्यात ठिक ठिकाणी मारून गंभीर जखमी करून तीचा खुना केला. वगैरे **फिर्यादी सपोउपनि/श्री कोमल बालाजी कागणे, ने पोस्टे हिमायतनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरन 18/2024 कलम 302, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री चौधरी, मो.नं. 9764123018** हे करीत आहेत.

## 2)खुनाचा प्रयत्न :-

**मनाठा :-** दिनांक 01.02.2024 रोजी चे 19.30 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरासमोर मौ. राळवाडी ता. हदगांव जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीचे पत्नीने आरोपी विरूध्द पोलीस स्टेशनला केस का केली व कोर्टात पोटगीचा दावा का दाखल केला म्हणुन फिर्यादीचे घरी जावुन फिर्यादीचे डोक्यात आरोपीने हातातील लोखंडी कोयत्याने दोन वार करून खुन करण्याचा प्रयत्नक केला व साक्षीदार आडविण्यास गेले असता आरोपीने साक्षीदार हिचे खांद्यावर कोयत्याने वार करून गंभीर दुखापत करून खुन करण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी बळीराम रामा भिसे, वय 28 वर्षे, व्यवसाय शेती रा. राळवाडी ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे मनाठा** गुरनं 14/2024 कलम 307, 506 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री तुकडे, मो.क्रं. 9049508135** हे करीत आहेत.

## 3)गंभीर दुखापत :-

**उमरी :-** दिनांक 02.02.2024 रोजी चे 07.30 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरासमोर चौक गल्ली उमरी ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीने आरोपीस आमच्या घरासमोर लेकराला संडासला बसवु नको असे म्हणाले असता यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीचे उजव्या हाताची करंगळी पिरगाळुन फॅक्चर केले व थापड भुक्याने मारहाण केली शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी सौ. गंगाबाई गोविंद मुटकूटवार, वय 50 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. चौक गल्ली ता. उमरी जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरन 57/2024 कलम 325, 324,323,504,506,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री कदम, मो. नं. 9623658510** हे करीत आहेत.

## 4)आत्महत्येस प्रवृत्त केले :-

**हदगांव :-** दिनांक 01.02.2024 रोजी चे 16.00 ते 17.00 वा. चे दरम्यान, **आयोध्यानगर हदगाव फिर्यादीचे राहते घरी ता. हदगांव जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीचा **मयत मुलगा नामे शिवराज आंबाराव देवसरकर, वय 17 वर्षे, रा. आयोध्यानगर हदगाव ता. हदगांव जि. नांदेड** याचे चारित्र्यावर संशय घेवुन त्यास थाबडबुक्याने मारहाण करून त्याची गल्लीत बदनामी करून शिवीगाळ करून अपमानीत केल्याने आत्महत्या केला. त्यास आत्महत्या करणेस यातील नमुद आरोपीतांनी प्रवृत्त केले. वगैरे **फिर्यादी आंबाराव दादाराव देवसरकर, वय 45 वर्षे, व्यवसाय शेती व ॲटोचाकल रा. सिंगापुर ह. मु. आयोध्यानगर हदगांव ता. हदगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगांव** गुरन 23/2024 कलम 306, 323, 504, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास मपोउपनि/श्री कदम, मो.नं. 7387500709** हे करीत आहेत.

## 5)विवाहीतेचा छळ :-

**अर्धापुर :-** दिनांक 01.09.2022 रोजी ते दिनांक 13.12.2023 रोजी 14.00 वा. पासुन, **फिर्यादीचे सासरी व माहेरी महुनगर छत्रपती संभाजीनगर व खैरगाव ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद सहा आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तु दिसायला चांगली नाहीस, तुला स्वयंपाक येत नाही. स्टाईल फर्शीचे दुकान टाकण्यासाठी तुझे माहेरहुन दोन लाख रूपये घेवुन ये म्हणुन शिवीगाळ व मारहाण करून शारिरीक व माणसीक छळ केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 23 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 34/2024 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/631 देशमुख, मो.क्रं. 9923647631** हे करीत आहेत.

## 6)जुगार :–

**अर्धापुर :–**दिनांक 02.02.2024 रोजी चे 18.10 वा. चे सुमारास, **तामसा बायपास बिजच्या जवळ आर्यन बारच्या पाठीमागे मोकळया जागेत ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररीत्या कल्याण क्लोज नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 2560/–रूपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/615 विजय रामराव कदम, ने. पोस्टे अर्धापुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 36/2024 कलम 12(अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2353 बोधमवाड, मो.नं. 9637973557** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड